# National Level Conference 2024

## 17 March 2024



## शिवदारे महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ फेब्रुवारी-**

''कटिंग एज रिसर्च इन लाइफ सायन्सेस मेथडॉ लॉजी अँड पेटेंट्स'' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन व्ही. जी. शिवदारे महाविद्यालयात केले होते. याचे उद्घाटन राष्ट्रीय डाळिंब संशोधन केन्द्राचे प्रमुख डॉ. आर. ए. मराठे, बीजभाषक मैसुरु विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रोफेसर डॉ. गीता एन. यांच्या उपस्थितीत झाले. सूत्रसंचालन प्रा. हरिप्रीया नायर यांनी केले. मार्गदर्शकांचा परिचय प्रा. श्वेता शिखरे व प्रा. स्नेहल जोशी यांनी केला. प्रा. ऋतुजा पवार यांनी आभार मानले. प्रथम सत्रात डॉ. प्रियांका पारी, मिस्टर बायोलॉजिस्ट, पुणे यांनी संशोधनपर लेखन करण्यासाठीचे नियोजन, तयारी, व शास्त्रीय पद्धती यांबद्दल मार्गदर्शन केले. तर द्वितीय सत्रात भारत सरकारच्या पेटेंट अॅन्ड डिझाईन्स विभाग, मुंबईतील साहाय्यक नियंत्रक, डॉ. अजय ठाकूर यांनी बौद्धिक संपदा, स्वामित्व, पेटेंट मिळवण्याच्या कायदेशीर प्रक्रिया, व्यापार चिन्ह, संशोधन व उत्पादनांचे भौगोलिक उपदर्शन या मुद्यांवर मार्गदर्शन केले.

## शेतीमध्ये संशोधनाच्या अनेक संधी

### राष्ट्रीय परिसंवादात संशोधकांना पुढाकाराची हाक

**संचार प्रतिनिधी**

**सोलापूर, दि. २१ -** भारतातील शेती विषयाच्या संशोधनात अनेक संधी असून संशोधकांनी पुढाकार घेऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूरचे प्रमुख डॉ. आर. ए. मराठे यांनी केले.



येथील व्ही. जी. शिवदारे महाविद्यालयात 'कटिंग एज रिसर्च इन लाइफ सायन्सेस मेथॉडॉलॉजी अँड पेटेंट्स' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. बीजभाषक म्हणून म्हैसूर विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. डॉ. गीता एन. या उपस्थित होत्या. त्यांनी विविध क्षेत्रांमधील नॅनोटेक्नॉलॉजीचे महत्त्व तसेच भविष्यात या तंत्रज्ञानामुळे सहज संभाव्य असणाऱ्या उपलब्धीबद्दल सखोल माहिती सादर केली.

कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात डॉ. प्रियांका पारी यांनी संशोधनपर लेखन करण्यासाठीचे नियोजन, तयारी व शास्त्रीय पध्दती याबद्दल मार्गदर्शन केले. तर द्वितीय सत्रात भारत सरकारच्या पेटंट अँड डिझाईन्स विभाग, मुंबई येथील सहायक नियंत्रक, डॉ. अजय ठाकूर यांनी बौद्धिक संपदा (आय. पी. आर.), स्वामित्व (कॉपीराईट) पेटंट मिळविण्याच्या कायदेशीर प्रक्रिया, व्यापार चिन्ह, संशोधन व उत्पादनांचे भौगोलिक उपदर्शन इत्यादी मुद्यांवर दैनंदिन उदाहरणांसह मार्गदर्शन केले. या सत्रादरम्यान डी. बी. एफ. दयानंद महाविद्यालयाच्या माइक्रोबायोलॉजी विभागप्रमुख डॉ. एस. एन. देशपांडे या अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या.

यावेळी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. सूतार, समन्वयक व जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. गोपिका मंजूनाथ, समन्वयक डॉ. अनमोल वळसंगे, डॉ. ऋषीकेश धनवे, डॉ. विनायक अडकी, प्रा. लक्ष्मीपुत्र गोटे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. हरिप्रिया नायर यांनी केले. परिचय प्रा. श्वेता शिखरे व प्रा. स्नेहल जोशी यांनी तर प्रा. ऋतुजा पवार यांनी आभार मानले.